# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
**दुरध्वनी क्रमांक. ०२० २५६५६२३४, ईमेल ropune.dte@gmail.com**

जा.क्र.तंशि/विकापु/लेखा ३/२०१६/ 5072 दिनांक -२०/१२/२०१६

**अतितात्काळ/कालमर्यादा दिनांक २६/१२/२०१६**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
**सर्व शासकीय व अनुदानित** महाविद्यालये,तंत्रनिकेतने,
अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी
पुणे विभाग, पुणे.

विषय - प्रलंबित लेखा परिच्छेद अनुपालनाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत या विभागीय कार्यालयातंर्गत असलेल्या सर्व शासकीय व अनुदानित संस्थांना कळविण्यात येते की, मा.महालेखापाल, मुंबई / नागपूर यांचे कडून आपल्या संस्थांचे लेखानिरीक्षण केले जाते. तदनंतर संबंधीत संस्थांना लेखा निरीक्षण अहवाल पाठविण्यात येतो. यामध्ये संस्थेतील लेखा आक्षेप /परिच्छेद नमुद केलेले असतात. सदर लेखा आक्षेपा/परिच्छेदाबाबत योग्य ती पुर्तता करून अनुपालन अहवाल संबंधीत मा. महालेखापाल यांना सादर करणे आवश्यक आहे. व त्याची प्रत तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व विभागीय कार्यालय, पुणे यांना पाठविणे आवश्यक आहे.

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे स्तरावर मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व मा. महालेखापाल, मुंबई व संबंधीत विभागीय कार्यालयाचे सहसंचालक, यांचे समेवत माहे जानेवारी २०१७ मध्ये मुंबई येथे लेखा परिच्छेद निकाली काढण्याचे अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

तरी सर्व शासकीय व अनुदानित संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील सद्यस्थितीत प्रलंबित असलेल्या तसेच निकाली निघालेल्या लेखा परिच्छेदाबाबतची माहिती खालील विहीत केलेल्या विवरणपत्रात आवश्यक त्या कागदपत्रासह विहीत केलेल्या मुदतीत या विभागीय कार्यालयास सादर करावी.

| संस्थेचे नाव | लेखा निरीक्षण झाल्याचे वर्ष | आक्षेप क्रमांक | लेखा आक्षेपाचा विषय | परिच्छेदाबाबत केलेली कार्यवाही | परिच्छेद निकाली काढण्यात आला असल्यास पत्र क्र.व दिनांक | परिच्छेद प्रलंबित असल्यास त्याची कारणे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |

Baiswal 20/12/16

सहसंचालककरिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे